महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY
& HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE. 411005

E-MAIL - sscboardpune@gmail.com


**परीक्षा प्राधान्य**

क्रमांक पुविमं/डीपी/320
पुणे ४११ ००५
दिनांक- १८/०१/२०२५

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे / अहिल्यानगर /सोलापूर

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) व माध्य. शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ कॉपीमुक्त अभियानांतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करणेबाबत...

संदर्भ- क्र.रा.मं./परीक्षा-५/२०१ दिनांक १७/०१/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) परीक्षा दिनांक ११/०२/२०२५ पासून दिनांक १८/०३/२०२५ पर्यंत तसेच माध्य. शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षा दिनांक २१/०२/२०२५ पासून दिनांक १७/०३/२०२५ पर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे.

दोन्ही परीक्षा पारदर्शकपणे व कॉपीमुक्त पार पाडण्याकरिता **मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यकमांतर्गत** दिनांक २० जानेवारी २०२५ ते दिनांक २६ जानेवारी २०२५ पर्यंत **कॉपीमुक्त अभियानांतर्गत जनजागृती सप्ताह** आयोजित करण्यात आला आहे.

याबाबत करावयाच्या कार्यवाहीचा तपशील सोबत पाठविण्यात येत आहे. सदर सप्ताह आयोजित करण्यासंदर्भात आपल्या अधिनस्थ असलेले सर्व मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना सूचित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दररोज सायंकाळी ५ वाजता ईमेलद्वारे पाठविण्यात यावा.

सोबत - क्र.रा.मं./परीक्षा-५/२०१ दिनांक १७/०१/२०२५ रोजीचे पत्र.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

प्रत माहितीस्तव - १. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे - सोबत जोडलेल्या पत्रानुसार आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Scanned with CamSca

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-५/ २०९
पुणे-४११००४
दि.-१७/०१/२०२५

प्रती,

विभागीय अध्यक्ष,
सर्व विभागीय मंडळे

विषय—उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी—मार्च २०२५ कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करणेबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. ११.०२.२०२५ ते दि. १८.०३.२०२५ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. २१.०२.२०२५ ते दि. १७.०३/२०२५ या कालावधीत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सदर दोन्ही परीक्षांना राज्यातून सुमारे ३१ लाख विद्यार्थी प्रविष्ट होणार असून सदर परीक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणा-या गैरप्रकारांना मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो त्यासाठीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना व उपक्रम राबवित असतात. त्याअनुषंगाने

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत, मा. शिक्षणमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी फेब्रुवारी—मार्च २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेचे वेळी राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिनांक २० जानेवारी ते दिनांक २६ जानेवारी २०२५ या कालावधीत कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आलेला आहे.

याबाबत करावयाच्या कार्यवाहीचा तपशील सोबत पाठविण्यात येत आहे. सदर सप्ताह आयोजित करणेसंदर्भात आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक व सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करणेबाबत सूचित करावे.

२) परीक्षा पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी ज्या माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ट होणार आहेत, त्या परीक्षा केंद्रासाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य शाळा/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(शरद गोसावी)
अध्यक्ष,
राज्यमंडळ, पुणे—०४.

प्रत माहितीस्तव :-

१) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
४) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व योजना) व शिक्षण निरीक्षक



Scanned with CamScanner

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा
फेब्रुवारी–मार्च २०२५

!! कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह !!

(कालावधी–सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ ते रविवार २६ जानेवारी २०२५)

| अ.क्र. | दिनांक | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | सोमवार<br>दि. २०/०१/२०२५ | स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करणेबाबत प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी माहिती देणे. |
| २ | मंगळवार<br>दि. २१/०१/२०२५ | कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये परिपाठाचे वेळी घेणे. (सोबत शपथेचा नमूना जोडला आहे.) |
| ३ | बुधवार<br>दि. २२/०१/२०२५ | शाळा स्तरावर मंडळ शिक्षासूचीचे वाचन करणे, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना, व प्रवेश पत्रावरील (Hall Ticket) सूचनांचे वाचन करणे. गैरमार्ग केल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे. |
| ४ | गुरूवार<br>दि. २३/०१/२०२५ | परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञांमार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयमध्ये पालक व विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करणे. |
| ५ | शुक्रवार<br>दि. २४/०१/२०२५ | परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशा प्रकारे लिहाव्यात याबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन करणे. तसेच राज्य मंडळामार्फत तयार केलेली चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविणे |
| ६ | शनिवार<br>दि. २५/०१/२०२५ | कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्ती घोषवाक्यासह शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे. |
| ७ | रविवार<br>दि. २६/०१/२०२५ | ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक/शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात वरील विषयांबाबत माहिती देणे व याबाबत जनजागृती करणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे. |

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४.

Scanned with CamScanner

# !! शपथ !!

मी शपथ घेतो की, मी फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही.

जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन.

**जय हिंद–जय महाराष्ट्र**

Scanned with CamSca

# कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी आदर्श कार्यपध्दती

## परीक्षापूर्व कालावधीत करावयाची कार्यवाही

१ परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचे गैरमार्ग प्रकार होणार नाहीत याबाबत विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक यांचे उद्बोधन, जनजागृती व वातावरणनिर्मिती विविध माध्यमांतून करावी.

२ परीक्षेदरम्यान परीक्षार्थ्याने गैरमार्गाचा अवलंब केल्यास मंडळाकडून होणा-या शास्तीची पूर्वकल्पना सर्व विद्यार्थी व पालक यांना शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत दिली जाईल, याबाबत खातरजमा करण्यात यावी.

३ परीक्षा केंद्रावर परीक्षा निर्धारित कालावधीत सुरू होईल तसेच निर्धारित वेळेत संपेल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

४ परीक्षा सनियंत्रणासाठी शिक्षण विभागासह महसूल व जिल्हा परिषदेशी संलग्न असलेल्या इतर सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना सहभागी करून घेण्यात यावे.

५ प्रत्येक केंद्रावर उपजिल्हाधिकारी व अन्य अधिकारी (तहसिलदार/गट विकास अधिकारी) यांच्या भेटीसंबधी सुव्यवस्थित नियोजन करणे.

६ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी आपल्या जिल्हयातील सर्वसाधारण, संवेदनशील तसेच अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रे निश्चित करून सदर यादी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.

७ प्रत्येक तालुक्यासाठी किमान एका भरारी पथकाची नेमणूक करावी. जर एखाद्या तालुक्यात परीक्षा केंद्रांची संख्या जास्त असेल तर आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक भरारी पथकांची नियुक्ती करावी.

८ भरारी पथकात किमान चार सदस्य असावेत. त्यामध्ये वर्ग १ / २ चे अधिकारी असावेत. शिवाय वर्ग ३ चे कर्मचारी असावेत. प्रत्येक भरारी पथकात किमान एक महिला प्रतिनिधीचा समावेश असावा.

९ परीक्षा केंद्रांना भेटी देताना दक्षता पथकातील अधिकाऱ्यांनी केंद्रप्रमुख, उपकेंद्र प्रमुख यांच्यासोबत परीक्षा दालनास भेटी देणे.

१० परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात पोलीस अधिनियम ३७ (१)(३) चा वापर करण्याबाबत पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षकांना कळविण्यात यावे. परीक्षा केंद्रावर पोलीस अधिनियम ३७ (१)(३) लावूनही बाहय उपद्रव कमी होत नसेल तर अशा केंद्रावर १४४ कलम लागू करावे.

११ सर्व परिरक्षण केंद्रावर हत्यारी पोलीस बंदोबस्त देण्यात यावे.

१२ संवेदनशील व अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रावर सर्वसाधारण परीक्षा केंद्रापेक्षा अधिकचा पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा.

१३ परिरक्षण केंद्रातून प्रश्नपत्रिकांची पाकिटे मुख्य परीक्षा केंद्रावर पोहोचविण्याची जबाबदारी सहाय्यक परिरक्षकाकडे (रनर) असते. प्रश्नपत्रिका वाहतूक करताना सहाय्यक परिरक्षकासोबत (रनर) सुरक्षिततेसाठी पोलीस कर्मचारी अथवा होमगार्ड शिपाई देण्यात यावा.

१४ परीक्षेचे संचालन सुरळीत होण्यासाठी तसेच परीक्षार्थी परीक्षा केंद्रावर वेळेवर पोहचण्यासाठी परिवहन विभागास योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. परीक्षेच्या कालावधीमध्ये अखंडीत विद्युत पुरवठा करण्याकरीता महावितरण विभागास कळविण्यात यावे.

१५ परीक्षा पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी ज्या माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ट होणार आहेत, त्या परीक्षा केंद्रासाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य माध्यमिक विद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

Scanned with CamScanner

## परीक्षा सुरू असताना करावयाची कार्यवाही

१ सदर भरारी पथकांचे परीक्षा केंद्र भेटीचे नियोजन करताना प्रत्येक भरारी पथक दर दिवशी वेगवेगळया तालुक्यात भेटी देतील असे नियोजन करावे.

२ परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उपलब्ध असेल तर ती यंत्रणा कार्यरत असून चित्रीकरणाची साठवणूक (Data Storage) होत असल्याबाबतची खातरजमा करण्यात यावी.

३ महत्वाच्या विषयांच्या विशेषतः इ. १० वी साठी इंग्रजी, गणित व विज्ञान, इ. १२ वी साठी इंग्रजी, गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, चिटणीसाची कार्यपध्दती, पुस्तपालन व लेखाकर्म, व्यापार संघटन, अर्थशास्त्र इ. विषयांच्या परीक्षेच्या दिवशी सर्व केंद्रांवर भरारी पथके जातील असे नियोजन करावे. त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ शिक्षणेतर विभागातून उपलब्ध करून घ्यावे.

४ संवेदनशील व अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रावर आवश्यकता भासल्यास बैठे पथकाची नियुक्ती करावी. बैठे पथक परीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षा केंद्रावर किमान एक तास अगोदर तसेच परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका परिरक्षण केंद्रावर पाठविणेपर्यंत थांबणे आवश्यक आहे.

५ सहाय्यक परिरक्षकाकडून (रनर) केंद्रसंचालकाकडे प्रश्नपत्रिकांची सीलबंद पाकिटे हस्तांतरीत करताना व सीलबंद प्रश्नपत्रिका पाकिटे परीक्षार्थ्यांचे समक्ष परीक्षा दालनात उघडताना व्हिडीओ चित्रीकरण होत असल्याची खातरजमा करण्यात यावी.

६ परीक्षेशी संबंधित घटकांनी नियमबाहय पध्दतीने मोबाईल अथवा तत्सम इलेक्ट्रॉनिक्स् उपकरणांचा वापर परीक्षा केंद्रावर होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७ ज्या परीक्षा केंद्रावर दिव्यांग विद्यार्थी प्रविष्ट होत असतील त्यांना शासन निर्णयानुसार अनुज्ञेय सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याबाबतची खात्री करावी.

८ ज्या विषयाची परीक्षा आहे त्या दिवशी त्या विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांना दालन पर्यवेक्षकाचे काम देवू नये अशी सूचना देण्यात आलेली आहे. याबाबत खातरजमा करण्यात यावी.

९ जिल्हयातील उच्चपदस्थ अधिका-यांनी (जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, उपजिल्हाधिकारी, प्रांत इ.) परीक्षा केंद्रांना तसेच परिरक्षण केंद्रांना पूर्वसूचना न देता आकस्मिकपणे भेट द्यावी.

१० परीक्षा चालू असताना परीक्षा केंद्र परिसरातील झेरॉक्सची दुकाने बंद ठेवण्याबाबत कृपया आदेश देण्यात यावेत.

११ परीक्षा संचालनात कोणत्याही स्तरावर गैरप्रकार आढळून आल्यास राज्य मंडळाने विहीत केलेल्या नमुन्यात नमूद करून संबंधित केंद्रसंचालकामार्फत विभागीय मंडळास पुढील कार्यवाहीसाठी अवगत करावे.

१२ विद्यार्थ्यांजवळ कॉपीचे साहित्य सापडल्यास त्याची उत्तरपत्रिका, कॉपीचे साहित्य हस्तगत करणे. कॉपी प्रकरणाबरोबर पाठवावयाच्या परिशिष्ट ब मध्ये कॉपी पकडणारे अधिकारी/सदस्य यांनी त्यांचे नाव, स्वाक्षरी व हुद्दा इत्यादी बाबी सुस्पष्ट अभिप्रायासह नमूद करणे.

१३ गैरमार्ग प्रकरण पकडल्यानंतर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पृष्ठावर 'कॉपिंग केस'(Copying Case) असे लिहिणे. त्यावर परीक्षार्थीचे निवेदन घेणे व आपली स्वाक्षरी करणे. गैरमार्ग प्रकरण पकडल्यानंतर कॉपी साहित्य, उत्तरपत्रिका व प्रपत्र इत्यादी माहिती अचूकपणे केंद्रभेट अभिप्राय पुस्तिकेत नमूद करणे.

१४ परीक्षा केंद्रावरील गैरप्रकाराच्या संदर्भात वृत्तपत्र अथवा अन्य माध्यमांना परस्पर कोणतीही माहिती न देणे.

Scanned with CamScanner

## परीक्षेची वेळ संपल्यानंतर करावयाची कार्यवाही

१. सदर भरारी पथकाने परीक्षा संपल्यानंतर तालुक्याचे ठिकाणी असलेल्या परिरक्षण केंद्राचेही निरीक्षण करावे.

२. सर्व परीक्षा केंद्रावरून प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकांची यादृच्छिकपणे सरमिसळ (Random Mixing) करून पुढील कार्यवाही होत असल्याबाबत खात्री करण्यात यावी.

३. परिरक्षण केंद्रातून (Custody) प्रश्नपत्रिकांची पाकिटे मुख्य परीक्षा केंद्रावर पोहचविण्याची जबाबदारी असलेल्या सहाय्यक परिरक्षकाचे (Runner) लाईव्ह लोकेशन परिरक्षकाकडून तपासले जात असल्याबाबतची खातरजमा करण्यात यावी.

४. परिरक्षण केंद्र (Custody) ते मुख्य परीक्षा केंद्र या दरम्यानच्या प्रवासाचे व्हिडीओ चित्रीकरण करून परिरक्षकाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत परिरक्षण केंद्राची तपासणी करत असताना पडताळणी करण्यात यावी.

५. परीक्षा केंद्रावर अनुपस्थित परीक्षार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका तसेच जादा असलेल्या प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राकडून परिरक्षकाकडे जमा केल्याबाबतची खातरजमा करण्यात यावी.

६. परीक्षा केंद्राचा दैनंदिन अहवाल (उपस्थिती, अनुपस्थिती, गैरमार्ग प्रकरणे इ.) मंडळाकडे सादर करण्याकरीता परिरक्षक व केंद्रसंचालक यांना सूचित करण्यात आलेले आहे. याबाबतची कार्यवाही होत असल्याची खातरजमा करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

Scanned with CamScanner